International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# ब्रिक्सचा विस्तार आणि 'डी-डॉलरायझेशन' : बदलती जागतिक सत्ता-संरचना आणि भारताची भूमिका

**प्रा. सुनिल कल्याण विधाते**

*राज्यशास्त्र विभाग, दहिवडी कॉलेज दहिवडी*

*Corresponding Author – प्रा. सुनिल कल्याण विधाते*

**DOI - 10.5281/zenodo.18655502**

***सारांश (Abstract):***

*आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करताना समकालीन जागतिक राजकारण व अर्थकारण हे झपाट्याने बहुध्रुवीय दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. या पार्श्वभूमीवर ब्रिक्स (BRICS) समूहाचा ब्रिक्स+ (BRICS+) म्हणून झालेला विस्तार आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांमध्ये अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने सुरू झालेली 'डी-डॉलरायझेशन'ची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरत असलेली दिसते. अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वामागे डॉलरचे जागतिक प्रभुत्व हे केंद्रस्थानी असले तरी, अलीकडील भूराजकीय संघर्ष, आर्थिक निर्बंध आणि जागतिक असमतोल यांमुळे अनेक देशांनी पर्यायी आर्थिक मार्गांचा शोध घेण्यास सुरुवात केलेली आहे असे दिसून येते. त्यामुळेच संशोधकाने प्रस्तुत संशोधन लेखात ब्रिक्स+ च्या विस्ताराची पार्श्वभूमी, डी-डॉलरायझेशनचे स्वरूप व कारणे, अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला निर्माण होणारी आव्हाने तसेच या संपूर्ण प्रक्रियेत भारताची संतुलित व धोरणात्मक भूमिका यांचे सखोल व विस्तृत विश्लेषण करण्यात आले आहे.*

***कीवर्ड्स: ब्रिक्स+ (ब्रिक्स+), डी-डॉलरायझेशन, बहुध्रुवीयता, जागतिक अर्थव्यवस्था, भारत, ग्लोबल साऊथ***

**प्रस्तावना (Introduction):**

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय आर्थिक अस्थिरतेला आळा घालण्यासाठी १९४४ मध्ये ब्रेटन वूड्स परिषदेत एक नवी जागतिक आर्थिक व्यवस्था उदयास आली. या व्यवस्थेमुळे अमेरिकन डॉलरला जागतिक राखीव चलन (Global Reserve Currency) म्हणून विशेष वर्चस्व प्राप्त झाले होते. आंतरराष्ट्रीय व्यापार, ऊर्जा व्यवहार (विशेषतः तेल व्यापार), परकीय चलन साठे, आंतरराष्ट्रीय कर्जव्यवस्था तसेच बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या व्यवहारांत डॉलरचा व्यापक वापर सुरू झाला. परिणामी अमेरिका केवळ आर्थिकच नव्हे तर राजकीय व धोरणात्मक दृष्ट्याही जागतिक पातळीवर प्रभावी महासत्ता म्हणून उदयास आली होती. डॉलरच्या या वर्चस्वामुळे अमेरिकेला जागतिक अर्थव्यवस्थेवर अप्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्याची क्षमता मिळाली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), जागतिक बँक (World Bank) आणि सोसायटी फॉर वर्ल्डवाइड इंटरबँक फायनान्शियल टेलिकम्युनिकेशन (SWIFT) सारख्या वित्तीय यंत्रणांवर अमेरिकेचा निर्णायक प्रभाव राहिलेला आहे. त्यामुळे आर्थिक निर्बंध (sanctions), कर्जपुरवठा आणि व्यापार धोरणांच्या माध्यमातून अमेरिका अनेक राष्ट्रांच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणांवर प्रभाव टाकू शकली.

तथापि, शीतयुद्धोत्तर काळात आणि विशेषतः २१व्या शतकात जागतिक सत्तासंरचनेत लक्षणीय बदल घडू लागले आहेत. चीन, भारत, रशिया, ब्राझील यांसारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांचा आर्थिक, राजकीय आणि धोरणात्मक प्रभाव वाढू लागला. 'ग्लोबल साऊथ'मधील राष्ट्रांनी पश्चिमकेंद्री आर्थिक व्यवस्थेबाबत असमाधान व्यक्त

करण्यास सुरुवात केली. आर्थिक निर्बंधांचा राजकीय शस्त्र म्हणून वाढता वापर, डॉलरच्या अस्थिरतेचे धोके आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वावरील मर्यादा यांमुळे विद्यमान एकध्रुवीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

याच पार्श्वभूमीवर ब्रिक्स समूहाचा ब्रिक्स+ म्हणून झालेला विस्तार आणि 'डी-डॉलरायझेशन'ची प्रक्रिया ही बदलत्या जागतिक सत्तासंरचनेची ठळक आणि प्रतीकात्मक लक्षणे म्हणून पुढे येतात. या घडामोडी केवळ आर्थिक बदल दर्शवत नाहीत, तर बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेकडे होत असलेल्या संक्रमणाचे द्योतक मानल्या जातात.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):**

1. ब्रिक्स समूहाच्या ब्रिक्स+ म्हणून झालेल्या विस्ताराची ऐतिहासिक, आर्थिक व भूराजकीय पार्श्वभूमी अभ्यासणे.
2. डी-डॉलरायझेशन या संकल्पनेचे स्वरूप व त्यामागील प्रमुख कारणे स्पष्ट करणे.
3. ब्रिक्स+ आणि डी-डॉलरायझेशनमुळे अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला निर्माण होणाऱ्या आव्हानांचे विश्लेषण करणे.
4. बहुध्रुवीय (Multipolar) जगाच्या निर्मितीमध्ये ब्रिक्स+ चे महत्त्व स्पष्ट करणे आणि या बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताची नेमकी भूमिका काय आहे, याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

हा संशोधन लेख गुणात्मक तसेच वर्णनात्मक–विश्लेषणात्मक पद्धतीवर आधारित आहे. अभ्यासासाठी दुय्यम स्रोतांचा वापर करण्यात आला असून, त्यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारण व अर्थकारणावरील मान्यताप्राप्त पुस्तके, संशोधन लेख, ब्रिक्स संबंधी अधिकृत निवेदने, तसेच रिझर्व बँक ऑफ इंडिया व इतर आंतरराष्ट्रीय संस्थांचे अहवाल यांचा समावेश आहे. उपलब्ध माहितीचे तुलनात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**१) ब्रिक्स ते ब्रिक्स+ विस्ताराची पार्श्वभूमी :**

ब्रिक्स समूहाचा ब्रिक्स+ म्हणून झालेला विस्तार हा एखाद्या अचानक घडलेल्या निर्णयाचा परिणाम नसून, तो दीर्घकालीन जागतिक आर्थिक व राजकीय बदलांचा परिपाक आहे. २००१ मध्ये गोल्डमन सॅक्सचे अर्थतज्ज्ञ जिम ओ'नील यांनी 'BRIC' ही संकल्पना मांडून त्याचे परिणाम मांडले आणि २००९ मध्ये रशियातील येकातेरिनबर्ग येथे पहिल्या शिखर परिषदेने याला औपचारिक स्वरूप मिळाले व ब्रिक्स या संघटनेची स्थापना झाली. पुढे २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या समावेशाने या गटाची व्याप्ती वाढली. सुरुवातीला ब्रिक्स ही संकल्पना उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या आर्थिक क्षमतेकडे लक्ष वेधणारी होती. मात्र पश्चिमप्रधान आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांमध्ये (IMF, World Bank) निर्णयप्रक्रियेत विकसनशील देशांचे मर्यादित प्रतिनिधित्व आणि प्रभाव हा समान अनुभव या देशांना एकत्र आणणारा ठरला आहे (Stuenkel, 2020).

२००८ च्या जागतिक आर्थिक संकटानंतर विद्यमान आंतरराष्ट्रीय व्यवस्थेतील संरचनात्मक मर्यादा अधिक ठळकपणे समोर आल्या. विकसित देशांनी स्वीकारलेल्या आर्थिक धोरणांचा परिणाम विकसनशील देशांवर असमतोल पद्धतीने होत असल्याची जाणीव या काळात तीव्र झाली. परिणामी ब्रिक्स देशांमध्ये परस्पर समन्वय वाढविणे आणि पश्चिमप्रधान संस्थांव्यतिरिक्त स्वतंत्र आर्थिक पर्याय निर्माण करण्याची गरज अधोरेखित झाली. न्यू डेव्हलपमेंट बँक (NDB) आणि Contingent Reserve Arrangement (CRA) यांची स्थापना ही याच प्रक्रियेचा भाग म्हणून पाहता येते (Pant, 2023).

२०२० नंतरची जागतिक परिस्थिती ब्रिक्स समूहाच्या विस्तारासाठी निर्णायक ठरली. कोविड-१९ महामारी, जागतिक पुरवठा साखळीतील अडथळे, ऊर्जा व अन्नसुरक्षेचे प्रश्न आणि युक्रेन युद्धानंतर वाढलेले आर्थिक निर्बंध यांमुळे विद्यमान जागतिक व्यवस्थेतील असुरक्षितता अनेक देशांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली (Acharya, 2018). या पार्श्वभूमीवर केवळ मर्यादित सदस्यसंख्येच्या ब्रिक्स समूहापेक्षा अधिक व्यापक व्यासपीठाची गरज निर्माण झाली.

ब्रिक्स+ अंतर्गत इराण, संयुक्त अरब अमिराती, इजिप्त आणि इथिओपिया यांसारख्या देशांचा समावेश हा केवळ संख्यात्मक विस्तार नसून धोरणात्मक स्वरूपाचा आहे. ऊर्जा-संपन्न मध्यपूर्व, आफ्रिकेतील उदयोन्मुख अर्थव्यवस्था आणि प्रादेशिक प्रभाव असलेली राष्ट्रे या गटात सहभागी झाल्यामुळे ब्रिक्स+ चे आर्थिक वजन, संसाधनांवरील नियंत्रण आणि भूराजकीय प्रभाव लक्षणीयरीत्या वाढले आहेत (ORF, 2024).

एकूणच या अभ्यासातून असे म्हणता येते की ब्रिक्स ते ब्रिक्स+ हा प्रवास बदलत्या जागतिक सत्तासंरचनेचे प्रतिबिंब आहे. हा विस्तार एकध्रुवीय व्यवस्थेऐवजी अधिक समतोल, समावेशक आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या दिशेने सुरू असलेल्या प्रक्रियेचा भाग असून, विकसनशील देशांच्या सामूहिक राजकीय व आर्थिक आत्मविश्वासाचे द्योतक म्हणून पाहता येतो.

**२) डी-डॉलरायझेशन: संकल्पना, स्वरूप व कारणे :**

डी-डॉलरायझेशन ही प्रक्रिया केवळ आर्थिक संकल्पना नसून ती समकालीन जागतिक राजकारणाशी निकट संबंधित आहे. साध्या शब्दांत सांगायचे झाल्यास, आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय व्यवहार आणि परकीय चलन साठ्यांमध्ये अमेरिकन डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या प्रयत्नांना 'डी-डॉलरायझेशन' असे म्हटले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रेटन वूड्स व्यवस्थेमुळे डॉलरला जागतिक राखीव चलनाचे स्थान प्राप्त झाले आणि कालांतराने हे वर्चस्व अधिक दृढ झाले (Acharya, 2018).

डॉलरचे वर्चस्व केवळ आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित न राहता राजकीय प्रभावाचे साधन म्हणूनही वापरले जाऊ लागले आहे. अमेरिकेने आर्थिक निर्बंध, बँकिंग व्यवहारांवरील नियंत्रण आणि आंतरराष्ट्रीय पेमेंट प्रणालींवरील प्रभाव यांचा वापर परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून केल्यामुळे अनेक देशांना डॉलर-केंद्रित व्यवस्थेतील असुरक्षितता प्रकर्षाने जाणवली आहे (Drezner, 2019). विशेषतः रशिया-युक्रेन युद्धानंतर रशियाला 'स्विफ्ट' (SWIFT) प्रणालीतून बाहेर काढल्यामुळे या असुरक्षिततेला अधिक ठळक स्वरूप प्राप्त झाले.

डी-डॉलरायझेशनचे स्वरूप विविध पातळ्यांवर दिसून येते. काही देशांनी द्विपक्षीय व्यापार व्यवहारांमध्ये स्थानिक चलनांचा वापर वाढविण्यास सुरुवात केली आहे, तर काही देशांनी त्यांच्या परकीय चलन साठ्यात सुवर्णाचा वाटा वाढविला आहे. याशिवाय, बहु-चलन व्यवहारांना प्रोत्साहन देणे, पर्यायी पेमेंट प्रणाली विकसित करणे आणि प्रादेशिक आर्थिक सहकार्य वाढविणे हेही या प्रक्रियेतील महत्त्वाचे पैलू मानले जातात (Stuenkel, 2020).

जागतिक आर्थिक अस्थिरता, विकसित देशांच्या आर्थिक धोरणांचा विकसनशील देशांवर होणारा परिणाम, तसेच आर्थिक सार्वभौमत्व टिकवून ठेवण्याची गरज ही डी-डॉलरायझेशनमागील प्रमुख कारणे आहेत. अनेक विकसनशील देशांना असे वाटते की डॉलरवर अतिविश्वास ठेवल्यास त्यांच्या देशांतर्गत आर्थिक धोरणांवर बाह्य राजकीय दबाव वाढू शकतो (त्रिपाठी, २०२३).

ब्रिक्स (BRICS) समूहाच्या संदर्भात डी-डॉलरायझेशनला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. न्यू

डेव्हलपमेंट बँक (NDB) द्वारे स्थानिक चलनांमध्ये कर्जपुरवठा करणे, सदस्य देशांमधील व्यवहारांमध्ये डॉलरऐवजी पर्यायी चलनांचा (उदा. रुपया-रुबल व्यापार) वापर करणे आणि 'ब्रिक्स पे' सारख्या पर्यायी पेमेंट प्रणालींवर चर्चा करणे, यामुळे डी-डॉलरायझेशनची प्रक्रिया आता संस्थात्मक स्वरूप धारण करत आहे (Reserve Bank of India, 2023).

एकूणच डी-डॉलरायझेशन ही प्रक्रिया तात्काळ डॉलरचे वर्चस्व संपविणारी नसून, ती हळूहळू विकसित होत जाणारी, बहुपातळीवरील आणि दीर्घकालीन स्वरूपाची आहे. ही प्रक्रिया जागतिक आर्थिक व्यवस्थेत अधिक लवचिकता, स्वायत्तता आणि समतोल निर्माण करण्याच्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून पाहता येते.

**३) ब्रिक्स+ व डी-डॉलरायझेशनमुळे अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला निर्माण होणारी आव्हाने :**

अमेरिकेचे जागतिक वर्चस्व हे प्रामुख्याने आर्थिक, संस्थात्मक आणि राजकीय अशा तीन पातळ्यांवर आधारित आहे. डॉलरचे जागतिक राखीव चलन म्हणून असलेले स्थान, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँके सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांवरील प्रभाव, तसेच आर्थिक निर्बंध लादण्याची क्षमता या घटकांमुळे अमेरिका जागतिक व्यवस्थेत प्रभावी ठरली आहे (Acharya, 2018). तथापि, ब्रिक्स+ चा विस्तार आणि डी-डॉलरायझेशनची प्रक्रिया या वर्चस्वाला दीर्घकालीन स्वरूपाचे आव्हान निर्माण करत असल्याचे दिसून येते.

डी-डॉलरायझेशनमुळे अमेरिकेची आर्थिक निर्बंध लादण्याची प्रभावी क्षमता काही प्रमाणात मर्यादित होण्याची शक्यता आहे. अनेक देश द्विपक्षीय व्यापारात स्थानिक चलनांचा वापर करू लागल्यास किंवा पर्यायी पेमेंट प्रणाली स्वीकारल्यास डॉलरवर आधारित आर्थिक दबावाचे साधन कमकुवत होऊ शकते (Reserve Bank of India, 2023). विशेषतः रशिया-युक्रेन युद्धानंतर आर्थिक निर्बंधांचा व्यापक वापर झाल्याने अनेक विकसनशील देशांनी डॉलर-केंद्रित व्यवस्थेतील धोके प्रत्यक्ष अनुभवले आहेत आणि त्यातूनच स्वायत्त आर्थिक धोरणांची गरज अधोरेखित झाली आहे (Pant, 2023).

ब्रिक्स+ चा विस्तार हा देखील अमेरिकन वर्चस्वासाठी महत्त्वाचा बदल ठरतो. ऊर्जा-संपन्न आणि प्रादेशिक प्रभाव असलेले देश (उदा. सौदी अरेबिया, इराण, युएई) या गटात सहभागी झाल्यामुळे जागतिक ऊर्जा बाजार, व्यापार मार्ग आणि वित्तीय व्यवहारांमध्ये अमेरिकेच्या नियंत्रणाला प्रबळ पर्याय निर्माण होऊ लागले आहेत. तथापि, या आव्हानांचे स्वरूप तात्काळ किंवा थेट नसून ते संरचनात्मक आणि दीर्घकालीन असल्याचे या अभ्यासातून दिसून येते (Stuenkel, 2020). हा बदल एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेकडून बहुध्रुवीय व्यवस्थेकडे होणाऱ्या संक्रमणाचे प्रतीक आहे.

**४) भारताची भूमिका आणि बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेतील ब्रिक्स+ चे महत्त्व :**

भारताची भूमिका ब्रिक्स आणि ब्रिक्स+ च्या संदर्भात संतुलित, व्यवहार्य आणि दीर्घकालीन राष्ट्रीय हितसंबंधांवर आधारित आहे. भारताचे परराष्ट्र धोरण ‘रणनीतिक स्वायत्तता’ (Strategic Autonomy) या तत्त्वावर आधारित असून, भारत कोणत्याही एका शक्तीगटाशी संपूर्णतः बांधील न राहता बहुपक्षीय सहकार्याला प्राधान्य देतो (Pant, 2023). त्यामुळे भारताने ब्रिक्स+ मंचाचा वापर 'पश्चिमविरोधी' (Anti-West) व्यासपीठ म्हणून न करता, जागतिक व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी 'बिगर-पश्चिमी' (Non-West) व्यासपीठ म्हणून केला आहे.

डी-डॉलरायझेशनच्या संदर्भात भारताचा दृष्टिकोनही व्यावहारिक स्वरूपाचा आहे. भारताने काही

निवडक देशांबरोबर (उदा. युएई, रशिया) स्थानिक चलनांमध्ये व्यापार वाढविण्यास सुरुवात केली असली, तरी डॉलरच्या वर्चस्वाला थेट आव्हान देण्याऐवजी आपली आर्थिक लवचिकता आणि सुरक्षितता वाढविण्यावर भर दिला आहे (Reserve Bank of India, 2023). या धोरणामुळे भारत जागतिक अर्थव्यवस्थेत एक जबाबदार आणि विश्वासार्ह भागीदार म्हणून पुढे येत आहे.

बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या दृष्टीने ब्रिक्स+ चे महत्त्व लक्षणीय आहे. हा मंच विकसनशील आणि उदयोन्मुख देशांना जागतिक प्रशासन प्रक्रियेत 'सामूहिक आवाज' मिळवून देतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक मधील संरचनात्मक सुधारणा, विकास वित्तपुरवठ्याचे पर्यायी मार्ग (New Development Bank द्वारे) आणि 'ग्लोबल साऊथ' (Global South) च्या समस्या जागतिक स्तरावर मांडण्याचे व्यासपीठ म्हणून ब्रिक्स+ महत्त्वाची भूमिका बजावत आहे (Observer Research Foundation, 2023).

**मर्यादा आणि आव्हाने :**

ब्रिक्स+ समूहाच्या वाढत्या प्रभावासोबत काही अंतर्गत मर्यादा आणि आव्हानेही स्पष्टपणे दिसून येतात. सदस्य देशांमधील आर्थिक असमतोल, विकासाची वेगवेगळी पातळी आणि परस्परविरोधी राष्ट्रीय हितसंबंध हे महत्त्वाचे अडथळे मानले जातात. विशेषतः, चीनचा वाढता आर्थिक आणि राजकीय प्रभाव हा गटातील इतर सदस्य देशांमध्ये (उदा. भारत आणि ब्राझील) धोरणात्मक चिंतेचा विषय ठरत असल्याचे अनेक अभ्यासकांनी अधोरेखित केले आहे (Stuenkel, 2020).

याशिवाय ब्रिक्स+ कडे अजूनही एकसंध धोरणात्मक दिशा आणि मजबूत संस्थात्मक यंत्रणेचा अभाव आहे. डी-डॉलरायझेशनसारख्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली वित्तीय पायाभूत रचना, परस्पर विश्वास आणि दीर्घकालीन समन्वय अद्याप पुरेशा प्रमाणात विकसित झालेला नाही. डॉलरला पर्याय म्हणून 'ब्रिक्स करन्सी' (BRICS Currency) आणण्याबाबत सदस्यांमध्ये असलेल्या तांत्रिक आणि राजकीय मतभेदांमुळे या प्रक्रियेचा वेग अपेक्षेपेक्षा संथ असल्याचे दिसून येते (Eichengreen, 2023).

**निष्कर्ष (Conclusion) :**

या संशोधनाच्या आधारे असे म्हणता येते की ब्रिक्स+ चा विस्तार आणि डी-डॉलरायझेशन ही प्रक्रिया अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाला तात्काळ संपविण्याचा प्रयत्न नसून, जागतिक व्यवस्थेला अधिक समतोल आणि बहुध्रुवीय बनविण्याच्या दिशेने सुरू असलेला दीर्घकालीन प्रवास आहे. डॉलरचे वर्चस्व अद्याप टिकून असले तरी, त्यावरील अवलंबित्व कमी करण्याचे प्रयत्न हे जागतिक आर्थिक स्वायत्ततेच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरत आहेत. भारताची भूमिका या संपूर्ण प्रक्रियेत संतुलित आणि वास्तववादी आहे. भारताने ब्रिक्स+ चा वापर राष्ट्रीय हितसंबंध जपण्यासाठी तसेच ग्लोबल साऊथचा आवाज बळकट करण्यासाठी केला आहे. भविष्यात ब्रिक्स+ हा मंच जागतिक राजकारणात अधिक प्रभावी ठरू शकतो; मात्र त्यासाठी अंतर्गत समन्वय, संस्थात्मक मजबुती आणि विश्वासार्ह धोरणात्मक दिशा आवश्यक ठरेल. एकूणच ब्रिक्स+ आणि डी-डॉलरायझेशन या घडामोडी बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेच्या उभारणीत महत्त्वपूर्ण ठरत असून, त्यांचे स्वरूप समजून घेणे हे समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी अनिवार्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) Acharya, A. (2018). *The End of American World Order* (2nd ed.). Polity Press.

२) Stuenkel, O. (2020). *The BRICS and the future of Global Order* (2nd ed.). Lexington Books.

३) Drezner, D. W. (2019). *The hidden hand of American hegemony: Explaining the interest rate power of the US dollar*. Post-Keynesian Economics Society.

४) Reserve Bank of India. (2023). *Report of the inter-departmental group on internationalisation of INR.* RBI Publications. https://www.rbi.org.in

५) Eichengreen, B. (2023). *The BRICS currency: A bridge too far?* Project Syndicate.

६) Mohan, C. R. (2023). *India and the BRICS: The strategic logic of multi-alignment.* Institute of South Asian Studies (ISAS).

७) त्रिपाठी, जे. (२०२३). *ब्रिक्सच्या विस्ताराचे महत्त्व आणि जागतिक राजकारणावर होणारा परिणाम*. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ORF).

८) त्रिपाठी, जे. (२०२३). *रुपयाचे आंतरराष्ट्रीयीकरण आणि डॉलरपुढील आव्हाने*. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन (ORF).

९) https://www.orfonline.org